# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाचखोरांना शिक्षा केल्याबाबत**

**(१) ४४० (१५-०१-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सन २००९ ते सन २०१४ या कालावधीत केलेल्या २२६६ कारवायांमध्ये केवळ ५१९ लाचखोरांना शिक्षा झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने माहे सप्टेंबर, २०१४ च्या दरम्यान लाचलुचपत प्रतिबंध विभागाला माहिती अधिकाराच्या कार्यकक्षेत वगळले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात प्रत्येक शासकीय कार्यालयात भ्रष्टाचारासंबंधी तक्रार कोठे करावयाची याबाबत स्पष्ट माहिती दिलेली असते मात्र एसीबीच्या अधिका-यांविरोधात कोठे तक्रार करावयाची याची माहिती सामान्यांना उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला माहिती अधिकार कक्षेत घेण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१५) :** (१) सन २००९ ते २०१४ या कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत राज्यात एकूण ३८९८ प्रकरणी कारवाई करण्यात आली असून त्यात एकूण ५३२ व्यक्तींना शिक्षा झाली आहे.

(२) होय.

(३) हे खरे नाही, एसीबीच्या अधिका-यांच्या विरोधात तक्रार दयावयाची झाल्यास टोल फ्री दुरध्वनीक क्र.१०६४ वर किंवा महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना समक्ष येऊन तसेच अपर पोलीस आयुक्त, ॲन्टी करप्शन ब्युरो, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांच्याकडे व पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरोच्या इतर परिक्षेत्रातील कार्यालयात वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे तक्रार करता येते.

(४) शासन आदेश सूचना दिनांक ३१.१०.२०१४ अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक विभागास माहिती अधिकारातून वगळयाबाबतची तरतुद रद्द करण्यात आली आहे.

---

**राज्यातील अपंग व्यक्तींना संगणक प्रणालीने दाखले वितरीत करण्याबाबत**

**(२) ४९४ (२३-१२-२०१४). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शास्त्रीय पध्दतीने संगणक प्रणाली प्रमाणे अपंगत्वाचे दाखले देण्याचा निर्णय घेतला असताना एकुण १५ लाख ६९ हजार ५८२ अपंगापैकी केवळ एक लाख ६५ हजार ८७६ जणांना गत पावणेदोन वर्षात दाखले देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व अपंगांना दाखले मिळावेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केले वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :** (१) दिनांक ३ डिसेंबर, २०१२ पासून दिनांक १०.०४.२०१५ पर्यंत एकूण २,२९,६३८ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १,६५,१३२ अपंगाना संगणकीय प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.

(२) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील २७ रुग्णालये आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील १५ वैद्यकीय महाविद्यालयांमधून अपंगाना संगणकीय प्रमाणपत्र दिले जाते. सदर रुग्णालयांना अपंगत्व प्रमाणपत्र तातडीने देण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाच्या जाचक अटी आणि शर्तीमुळे केवळ एक टक्का रुग्णांवर**
**किडणी प्रत्यारोपण करण्यात येत असल्याबाबत**

**(३) ५०६ (२३-१२-२०१४). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दरवर्षी किडनी प्रत्यारोपणाचे चार लाख रुग्ण नोंदविले जात असतांना शासनाच्या जाचक अटी आणि शर्तीमुळे केवळ एक टक्का रुग्णांवर किडणी प्रत्यारोपण करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किडणी प्रत्यारोपणास असलेल्या जाचक अटी व शर्ती शिथिल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :**(१) नाही, राज्यात दरवर्षी सरासरी ७०९ रुग्णांनी किडणी प्रत्यारोपणासाठी नोंदणी केली असून त्यापैकी ५३ रुग्णांवर किडणी प्रत्यारोपण करण्यात आले आहे. म्हणजेच सरासरी ७ % किडणी प्रत्यारोपण होत आहे.

(२) अवयव प्रत्यारोपणासाठीच्या अटी मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा, १९९४ व नियमावली, १९९५ नुसार आहेत.

तथापि जनहित याचिका ०५/२०१३ प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्याबाहेरील रिलेटेड केसेसच्या अवयव प्रत्यारोपण संदर्भात त्या राज्याच्या राज्य ऑथोरायझेशन कमिटी कडील ना हरकत प्रमाणपत्र (NOC) आणण्याबाबतची अट २०१३ पासून शिथिल करण्यात आली आहे.

तसेच मा. लोकप्रतिनिधींनी अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठीच्या प्रक्रियेमध्ये सुलभता आणण्यासाठी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने तज्ञांची बैठक आयोजित करुन ऑथोरायझेशन कमिटीकडून अवयव प्रत्यारोपणासाठी देण्यात येणाऱ्या परवानगीची वैधता ३ महिन्यांवरुन ६ महिन्यांपर्यंत वाढविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील तीर्थक्षेत्र स्थळांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) १३५१८ (०८-०४-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात एकूण ७३ तीर्थक्षेत्रे असून जिल्हा परिषदेकडून यात्रा महोत्सवासाठी केवळ १५ हजार रुपयांची मदत देण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऐतिहासीक चंद्रपूर हे तीर्थस्थळ आणि पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे स्थळांकडे निधी उपलब्ध करुन देण्यात आधीच्या शासनाचे दुर्लक्ष झाले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चंद्रपूर जिल्हयातील तीर्थस्थळ आणि पर्यटनास विकास करण्याच्या दृष्टीने कोणती भरीव आर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्हा परिषदेअंतर्गत "क" वर्ग दर्जाचे एकूण ७७ तीर्थक्षेत्रे असून सन २०१४-१५ मध्ये १७ ग्रामपंचायतींना यात्रेच्या व्यवस्थेकरीता उदा.पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत व्यवस्था, परिसर व्यवस्था व स्वच्छता, पेन्डाल साऊंड सर्व्हीस डेकोरेशन व इतर किरकोळ खर्च भागविण्याकरीता एकूण रु.३.५० लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. प्रत्येक ग्रामपंचायतींना, ग्रामपंचायतीची निधीची मागणी, यात्रा कालावधी व यात्रेतील भाविकांचा सहभाग हे विचारात घेऊन पुरेसा निधी उपलबध करुन देण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

"क" वर्ग तीर्थक्षेत्राच्या विकासाकरीता जिल्हा नियोजन समितीमार्फत एकूण रु.७.२७ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयाची भूजल पातळी खालावली असल्यामुळे पाणी टंचाई निर्माण होणार असल्याचा अहवाल भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणेने दिल्याबाबत**

**(५) १३५२१ (०७-०४-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयाची भूजल पातळी ०.०६ मीटरने खालावली असल्यामुळे जिल्हयातील तब्बल ७३ गावांत पाणी टंचाई निर्माण होणार असल्याचा अहवाल भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणेने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना सादर केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१८-०६-२०१५) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या गृहीतकांप्रमाणे ज्या भागात १ मीटर किंवा त्यापेक्षा जास्त भूजल पातळीत घट झाली असेल अशा भागात संभाव्य टंचाई घोषित करण्यात येते व ज्या भागात ०-१ मीटरच्या दरम्यान घट असेल तेथे मॅनेजेबल टंचाई गृहीत धरण्यात येते. त्यानुसार भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने केलेल्या सर्वेक्षणानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील ०.०६ मी. ने भूजल पातळीत घट झालेल्या नमूद ७३ गावात टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाही.

भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी दिलेल्या अहवालानुसार आवश्यकतेनुसार शासन निर्णय दि.३/२/१९९९ अन्वये ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ विविध उपाययोजना जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागातील कर्मचाऱ्यांचे वेतन थांबविल्याबाबत**

**(६) १३५२४ (०८-०४-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागातील सर्व कर्मचा-यांनी एक दिवसाची रजा घेवून जिल्हा परिषद कार्यालय, चंद्रपूर समोर पशुसंवर्धन विभागातील कर्मचा-यांचे वेतन

थांबविल्यामुळे दिनांक ११ जानेवारी, २०१५ व त्यादरम्यान निदर्शने केल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशुसंवर्धन विभागातील सर्व कर्मचा-यांनी रजा घेतल्यामुळे पशुवैद्यकीय सेवा पुर्णपणे विस्कळीत झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातील कर्मचा-यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) दि. १० जून, २०१४ पासून पशुचिकित्स व्यवसायी संघटनाने बेमुदत अहवाल बंद व असहकार आंदोलन सुरु केले होते. त्यामुळे त्यांचे वेतन अदा केले नव्हते परंतु जसजसे नियमित अहवाल सादर करणे व पशुपालकांना सेवा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु केल्यानंतर संबंधितांचे वेतन अदा करण्याची कार्यवाही सुरु केली व मागण्यांच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**आकोट तालुक्यातील सामाजिक वनीकरण विभाग, अकोला परिक्षेत्र आकोट अंतर्गत एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP) मंद गतीने सुरु असल्याबाबत**

**(७) १३५३३ (०८-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आकोट तालुक्यातील सामाजिक वनीकरण विभाग, अकोला परिक्षेत्र आकोट अंतर्गत एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP) प्रकल्प ९ अंतर्गत सात ग्राम पंचायती मध्ये पाणलोट सेवा समित्यामार्फत गेल्या तीन वर्षातुन सुरु असून परंतु कामे मात्र अत्यंत संथ गतीने सुरु आहे तसेच गाव पातळी वरील समिती सचिवांचे मानधन गेल्या माहे फेब्रुवारी, २०१४ पासून देण्यात आलेले नाही, त्यामुळे प्रकल्पाच्या कार्याला योग्य चालना मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोट, तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत २५८ सिंचना विहिरीचे कामे अपूर्ण असल्याबाबत**

**(८) १३५३६ (०८-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट, तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत २५८ सिंचन विहिरीचे कामे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मार्च अखेर हि कामे पूर्ण करण्याचे निर्देष जिल्हाधिकारी अकोला यांनी संबंधित अधिका-यास दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी सिंचन विहीरचे तातडीने कामे पुर्ण करण्याचे दृष्टीने शासनाने काय उपाययोजना आखली वा आखण्यात येत आहे,

(४) असल्यास मार्च अखेर २५८ सिंचन विहीरींचे कामे पूर्ण न झाल्यास व निधी परत गेल्यास जबाबदार अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करणार वा करण्यात येईल,

(५) असल्यास, तद्नुषंगाने तातडीने कामे पुर्ण व्हावे यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे व केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०४-२०१५) :** (१) अकोला जिल्ह्यातील अकोट व तेल्हारा तालुक्यात धडक सिंचन विहिर व महात्मा गांधी नरेगा सिंचन विहिर या योजनेअंतर्गत एकूण २५८ विहिरींची कामे हाती घेण्यात आली आहेत. यापैकी अकोट तालुक्यातील ११७ व तेल्हारा तालुक्यातील ४९ विहिरींची कामे पुर्ण झाली आहेत.

(२) जिल्हाधिकारी यांनी अपुर्ण विहिरीची कामे जून, २०१५ अखेर पुर्ण करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

(३) शासनाने धडक सिंचन विहिरी दिनांक ३० जून, २०१५ पुर्वी पुर्ण करण्याच्या सुचना दिल्या आहेत. सिंचन विहीरींची कामे पुर्ण करण्याच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणी व उपाययोजना यासंदर्भात शासन स्तरावर दिनांक २९ जानेवारी, २०१५ रोजी आढावा बैठक घेण्यात आली. नरेगा अंतर्गत सिंचन विहिरीसंदर्भात शासन परिपत्रक दिनांक ७ मार्च, २०१५ नुसार अतिरिक्त सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच यासंदर्भात शासन स्तरावरील अधिकाऱ्यांनी विभागीय स्तरावर विहिरींच्या संदर्भात आढावा बैठका घेतल्या आहेत.

(४) व (५) उर्वरित अपूर्ण विहिरींची कामे तातडीने पुर्ण करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यासाठी गट विकास अधिकारी अकोट व तेल्हारा हे स्वत: दौरे करुन तपासणी करत आहेत.

---

**शिरसोली (ता.तेल्हारा जि.अकोला) येथील गावातील नागरिकांना नियमित पाणी पुरवठा होणेबाबत**

**(९) १३५४३ (०७-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरसोली (ता.तेल्हारा जि.अकोला) या गावातील गत १० ते १५ वर्षापासून असलेली नळ वाहिनी वारंवार फुटत असल्याने गेल्या १० महिन्यापासून गावातील नागरिकांची पाण्याविना

गैरसोय होत असून याकडे जीवन प्राधिकरण विभागाच्या अधिका-यांचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-०६-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

अकोट ८४ खेडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजने अंतर्गत एकूण तीन जलशुध्दीकरण केंद्र आहेत. त्यापैकी अडगांव बु. येथे २.०० द.ल.ली. क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र आहे. सदर जलशुध्दीकरण केंद्रावरुन अडगांव बु., अडगाव खु. शिवाजीनगर व सिरसोली या चार गावांना शिखरपरिषदेमार्फत पाणी पुरवठा सुरु आहे. अडगांव बु.ते सिरसोली या दरम्यान टाकण्यात आलेली पाईप लाईन ६४०० मी. लांबीची आहे. या लांबी दरम्यान नदी-नाले असल्यामुळे पावसाळ्यात नदी-नाल्या लगतची पाईप लाईन कधी-कधी उघडी पडते. तसेच या लांबी दरम्यान असलेल्या अडगांव खु. येथील काही ग्रामस्थ सदर पाईप लाईन उन्हाळ्यामध्ये फोडून गुरांची पाण्याची सोय करतात. त्यामुळे अशा वेळी सिरसोली गांवात अपूरा पाणी पुरवठा होतो. सदर योजना शिखर परिषदेमार्फत राबविली जात असल्यामुळे त्यामधील समाविष्ट गावांसाठी टाकलेल्या पाईपलाईनची देखभाल दुरुस्ती संबंधित ग्रामपंचायत मार्फत करण्यात येते. सद्य:स्थितीत सिरसोली गावाकरीता टाकलेल्या पाईप लाईनवरील गळत्या ग्रामपंचायतीने काढल्या असून योजनेचा गावास पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे.
(२) सदर योजनेबाबत कोणताही निर्णय अडगाव शिखर समिती मार्फत घेण्यात येत असल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने चौकशी केलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आकोट (जि.अकोला) तालुक्यातील आंबोडा गावातील लाभार्थ्यांना घरकुल योजनेसाठी जागा मिळणेबाबत

**(१०) १३५५० (०८-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आकोट (जि.अकोला) तालुक्यातील आंबोडा गावातील ३२ घरकुल योजनेसाठी लाभार्थ्यांना जागा मिळणेसाठी ग्रा.प. आंबोडा यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०१३ ते ६ जानेवारी, २०१४ व स्थानिक लोकप्रतिनिधी यांना माहे जानेवारी, २०१५ दरम्यान वारंवार निवेदन देणे तसेच तहसिलदार आकोट यांचेकडे घरकुल जागा मागणीबाबत प्रस्ताव अद्याप प्रलंबित असने, त्यावर कुठलीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी योग्य ती कार्यवाही केली काय व सदर ३२ लाभार्थी यांना जागा देणे संदर्भात ग्रा.प.आंबोडा कडून प्रस्ताव आला त्यावर कोणती कारवाई केली वा निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०७-२०१५) :** (१) होय.

(२) गावठाणातील रिक्त जागा वाटपाचे अधिकारी तहसीलदारांकडे असल्यामुळे अकोट, जि.अकोला तालुक्यातील आंबोडा गावातील ३२ घरकुल लाभार्थ्यांचे जागा मिळण्याबाबतचे प्रस्ताव तहसलिदार, ता.अकोट यांचेकडे दि.२३.१२.२०१३ रोजी पाठविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वान प्रकल्पामध्ये (जि.अकोला) पाच शाखा मिळून कर्मचारी संस्था अपूरी असल्याने प्रभावी सिंचन योजना राबविता येत नसणेबाबत**

**(११) १३५५१ (०८-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वान प्रकल्पांचे (जि.अकोला) काम पुर्ण झाले असुन तात्पुरत्या सिंचन शाखा निर्माण करण्यात आल्या परंतु अद्याप हस्तांतरीत न होने, तसेच प्रकल्पाच्या पाच शाखा मिळुन १०० कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे, तथापि, २० कर्मचाऱ्यांवर पूर्ण पाच शाखांचे कामकाज सांभाळावे लागत असल्याने क्षेत्रात प्रभावी पणे सिंचन करता येत नाही व उद्दिष्ट साध्य करण्यात अडचणी येतात हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी काय निर्णय घेतला असुन कर्मचारी वर्ग भरणा करण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाची दखल घेत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास काय, आढळून आले व त्यानुसार कोणता निर्णय सिंचन होण्याच्या दृष्टीने घेणार वा घेण्यात येत आहे,

(५) अद्याप कुठलीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५) :** (१), (२), (३), (४) व (५) याबाबतच्या प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावरुन प्राप्त झाला आहे. राज्यातील महामंडळ कार्यालयांकडील विभाग/उप विभाग कार्यालयांच्या कामांचा आढावा घेऊन, कामे पूर्ण/ पुर्णत्वाच्या अंतिम टप्प्यावर असलेल्या कार्यालयाच्या मूळ कार्यप्रकारात आवश्यकतेनुसार बदल करुन त्यांचे आवश्यक त्या कार्यप्रकारात रुपांतरण करण्याची कार्यवाही शासन स्तरावर करण्यात येत आहे. त्यानुसार याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

---

**राज्यातील ५० क्रीडा मार्गदर्शकांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत**

**(१२) १३५६७ (०९-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या ग्रामीण व अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना अदययावत क्रीडा शिक्षण देण्यासाठी राज्यात ५० क्रीडा मार्गदर्शकांची मानधन तत्वावर नेमणुका करण्यात आल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गदर्शकांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री क्रिडा व युवक कल्याण यांचेकडे दिनांक २५ जुलै, २०१४ रोजी वा त्या सुमारास केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०७-२०१५) :** (१) पदकविजेते खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने योजना राबविण्यासाठी क्रीडा व युवकसेवा, संचालनालयाच्या आस्थापनेवर क्रिडा मार्गदर्शकांची १५३ पदे मानधन तत्त्वावर निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यानुसार सद्य:स्थितीत ६२ क्रीडा मार्गदर्शकांची मानधन तत्त्वावर नियुक्ती करण्यात आली आहे हे खरे आहे.
(२) मानधन तत्त्वावरील क्रीडा मार्गदर्शकांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दिनांक ०७.०७.२०१४ च्या पत्रान्वये तत्कालीन मा.मंत्री, क्रिडा व युवक कल्याण यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे.
(३) मानधन तत्त्वारील क्रीडा मार्गदर्शकांची पदे पुर्णत: करार पध्दतीने भरण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असल्यामुळे या मार्गदर्शकांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्याची मागणी मान्य करता येणार नाही. तथापि मानधनावरील क्रिडा मार्गदर्शकांना शासनाकडून वेळोवेळी मुतदवाढ दिली जात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यामध्ये बांधकाम नाका कामगारांच्या संघटनाने आपल्या मागण्याबाबत**

**(१३) १३५९० (०८-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये बांधकाम नाका कामगारांच्या संघटना आपल्या मागण्यांसाठी वारंवार आंदोलने करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाका कामगारांना थांबण्यासाठी कायमस्वरूपी शेड, शौचालय, पिण्याच्या पाण्याची सोय व रूग्णवाहिका इत्यादी मागण्या संघटनांनी केल्या आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नाका कामगारांना हॉस्पिटलमध्ये आरोग्याच्या संरक्षणाकरिता राखीव जागाबाबत देखील मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने त्यांच्या प्रश्नाबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, तसेच त्यांच्याकरिता अर्थसंकल्पामध्ये विशेष आर्थिक तरतुद केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व कधीपर्यंत त्यांचा प्रश्न सोडवला जाईल ?

**श्री. प्रकाश मेहता (०१-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.
(४) व (५) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत असलेल्या बांधकाम कामगारांसाठी मंडळाने ज्या ज्या कल्याणकारी योजना बनविलेल्या आहे, त्या सर्व योजनांचे फायदे बांधकाम नाका कामगार, मंडळाकडे नोदींत झाल्यानंतर घेवू शकतात.

---

**मौजे गोवर्धन महादेवपुर गंगापूर व पाथर्डी (ता.जि.नाशिक) या मिळकतींबाबत कुळकायदा कलम ६३ चे उल्लंघन झाल्याबाबत**

**(१४) १३६०४ (०४-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गोवर्धन महादेवपुर गंगापूर व पाथर्डी (ता.जि.नाशिक) या मिळकतींबाबत कुळकायदा कलम ६३ चे उल्लंघन झाल्याने अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्याचा शासनाने माहे जून २०१४ मध्ये निर्णय घेऊनही सदर प्रकरणी माहे जानेवारी २०१५ पर्यंत कोणतीही कार्यवाही न करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जुलै २०१४ मध्ये जिल्हा प्रशासनास निवेदन दिलेले होते, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशी नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) :** (१), (२), (३) व (४) प्रश्नाधिन प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी नाशिक यांनी उपविभागीय अधिकारी, नाशिक व उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर यांना चौकशी करण्याचे दि.२०.२.२०१४ रोजी निर्देशित केले होते. त्यानुसार याप्रकरणी चौकशी करुन तक्रारीत नमूद मिळकतींच्या संदर्भात हस्तांतरण होऊ नये व त्रयस्थ पक्षांचे हितसंबंध निर्माण होवू नये म्हणून उपविभागीय अधिकारी नाशिक यांनी दि.२०.५.२०१४ रोजीच्या आदेशान्वये, सदर मिळकतींच्या अधिकार अभिलेखात पुढील आदेश होईपावेतो "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याचे आदेश पारीत केले आहेत.

तसेच, उपविभागीय अधिकारी, इगतपूरी-त्र्यंबकेश्वर यांनी संबंधित फेरफार नोंद स्वाधिकारे पुनरिक्षणात घेतली असून, सदर प्रकरणी अंतिम निर्णय होईपर्यंत मौजे कुर्णोली, ता.इगतपुरी येथील गट क्र. १२९ या मिळकतीत कोणत्याही फेरफाराची नोंद करण्यात येवू नये यासाठी दि.९.६.२०१४ रोजी स्थगिती आदेश पारित केलेले आहेत. तहसिलदार इगतपुरी यांना सदर मिळकतीसंदर्भात महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम-८४ क अन्वये कार्यवाही करण्याबाबत सूचित केलेले आहे.

---

**नाशिक शहरातील मातंग समाजाच्या महिलांना टेंडर न मागविता प्रायोगिक तत्वावर कामे देण्याबाबत**

**(१५) १३६०५ (१०-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील विविध स्मशानभुमीमध्ये राख चाळण्याचे काम करणा-या मातंग समाजाच्या महिलांना सामाजिक न्याय विभागातील वसतीगृहे व कार्यालयातील साफसफाई, माळीकाम इत्यादी कामे टेंडर न मागवता प्रायोगिक तत्वावर देण्याबाबत दिनांक ३१ जानेवारी, २०१४ रोजी शासनस्तरावरील बैठकीत निर्णय होवूनही सदर निर्णयाची माहे जानेवारी, २०१५ पर्यंत अंमलबजावणी केलेली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) :** (१) नाही.

तथापि तत्कालिन मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम, पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३०/१/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत नाशिक येथील प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, सहायक आयुक्त, समाजकल्याण, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (कार्यालये व वसतीगृहे) तसेच नाशिक महानगरपालिकेची कार्यालये यामधील साफसफाई, माळीकाम, सुरक्षा रक्षक इत्यादी कामे टेंडर न मागविता मातंग समाजातील अशा महिलांना प्रायोगिक तत्वावर देण्यात यावीत असे तत्कालीन मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम, पर्यटन) महोदयांनी निर्देश दिलेले आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रेडीरेकनरच्या तळटिपा अन्यायकारक असल्याबाबत**

**(१६) १३६१० (०४-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेडीरेकनरच्या तळटिपा अन्यायकारक असल्यामुळे सदर तळटिपांबाबत पुनर्विचार करण्याची बांधकाम व्यवसायिकांच्या संघटनेने दि. २३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०६-२०१५) :** (१) व (२) अभिलेखाची तपासणी केली असता असे मागणी पत्र प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. तथापि, याच विषयाबाबत प्राप्त निवेदनांतील सुचनांचा सांगोपांग विचार करुन सन २०१५ च्या बाजारमुल्य दर तक्त्यासोबतच्या मार्गदर्शक सुचना अधिक व्यवहार्य करुन निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुण्याच्या येरवडा मनोरुग्णालयातील अधिक्षकांना निलंबित करण्याची मागणी**

**(१७) १३६११ (०८-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्याच्या येरवडा मनोरुग्णालयातील असहाय्य रुग्णांच्या होणाऱ्या भयानक हालअपेष्टांना आणि सफाई कर्मचाऱ्यांची मजुरी थकविण्याच्या प्रकाराला अधिक्षक जबाबदार असल्याने त्यांना निलंबित करण्याची 'जन आरोग्य अभियान' या संघटनेने माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मनोरुग्णालयात अधिक्षकांनी विधानसभेची दिशाभुल केल्याची घटना दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) आल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**डॉ. दीपक सावंत (१०-०७-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
जनआरोग्य अभियान संघटनेने ऑक्टोबर २०१४ मध्ये मागणी केलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) जनआरोग्य अभियान संघटनेच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये दोषी आढळून आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

---

**नाशिक जिल्हयातील लघुपाटबंधारे योजना काचुली (ता.त्र्यंबकेश्वर) या प्रकल्पाच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आल्याबाबत**

**(१८) १३६१८ (०८-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील लघुपाटबंधारे योजना काचुली (ता.त्र्यंबकेश्वर) या प्रकल्पाच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आल्याची जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१४ वा तत्पुर्वी शासनाकडे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर प्रकल्पाच्या कामाची महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था तसेच दक्षता व गुणनियंत्रक विभागाकडून तपासणी करण्याची मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१५) :** (१) होय,
(२) होय,
(३) व (४) अधिक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे यांचे मार्फत प्राथमिक अन्वेषण कार्यवाहीत आहे.

---

## नाशिक जिल्ह्यातील डाळींब पिक तेल्या, मर व प्लेग या रोगांमुळे नामशेष होत असल्याबाबत

**(१९) १३६२१ (०८-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील डाळींब पिक तेल्या, मर व प्लेग रोगाच्या आक्रमणामुळे नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याने व कृषी तज्ञांना या रोगावर रामबाण उपाय शोधता न आल्याने डाळींब उत्पादक शेतकरी हतबल झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रोगांवर नियंत्रणासाठी तसेच या रोगांनी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०६-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) तेल्या व मर रोगावरील प्रतिबंधक उपायासंदर्भात महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहूरी तसेच डाळींब संशोधन व तंत्रज्ञान प्रसारण केंद्र लखमापूर यांच्यामार्फत शेतकरी प्रशिक्षण राबविण्यात येते तसेच शेतकऱ्यांमध्ये जनजागृती होण्यासाठी १२३३ भित्ती पत्रके, ११२ गाव बैठका, २६ शेतकरी मेळावे, तसेच एसएमएस सल्ला किसान पोर्टल मार्फत देण्यात आलेले आहे. तेल्या, मर रोगाचे प्रमाण आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या वर गेल्यास शेतकऱ्यांना ५०% अनुदानावर किटकनाशके उपलब्ध करुन देण्यात येतात.

राज्यात माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१४ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे नुकसान झालेल्या फळपिकांसाठी रु.२५०००/- प्रति हेक्टर अशी आर्थिक मदत देण्याचा निर्णय, शासनाने घेतला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांसाठी ट्रक टर्मिनसकरीता जागेची उपलब्धता होऊनही काम सुरु झाले नसल्याबाबत**

**(२०) १३६२८ (०९-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांसाठी ट्रक टर्मिनसकरीता जागेची उपलब्धता होऊनही माहे जानेवारी, २०१५ पर्यत शासनाने प्रशासकीय मान्यता न दिल्याने सदर काम सुरु झालेले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे काम लवकर सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०६-२०१५) :** (१) व (२) अंबड औद्योगिक क्षेत्रातील २१९९८.५० चौ.मी. क्षेत्रफळ असलेला भूखंड क्र. एएम -४३ हा ट्रक टर्मिनससाठी राखीव ठेवण्यात आला आहे व त्यासाठी रु.६०८.६५ लक्ष (नक्त) व रु.६९९.६५ लक्ष (ठोक) इतक्या खर्चाच्या रकमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्यास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात येत आहे. प्रशासकीय मान्यतेनंतर निविदा प्राप्त करुन सदर काम लवकरच सुरु करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव महानगरपालिकेच्या हद्दीत अतिवृष्टीमुळे रस्ते नादुरुस्त झाल्याने वारंवार अपघात होऊन नागरीक जखमी होत असल्याबाबत**

**(२१) १३६५२ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव महानगरपालिकेच्या हद्दीत अतिवृष्टीमुळे रस्ते नादुरुस्त झाल्याने वारंवार अपघात होऊन नागरीक जखमी होत असल्याच्या तक्रारी वाढल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका हद्दीतील रस्ते सुधारणा करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) असल्यास, रस्ते सुधारणे साठी निधीची तरतुद करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
अशा प्रकारच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झाल्या नाहीत.
(२) व (३) रस्ते दुरुस्तीची कामे महानगरपालिकेमार्फत निधीच्या उपलब्धतेनुसार करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महिलांकरिता नोकरीसाठी आरक्षणाची टक्केवारी वाढविण्याबाबत**

**(२२) १३६५६ (१०-०४-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अंध महिला, विधवा महिला व इतर अवयवांनी अपंग असलेल्या महिलांकरिता शासनाकडून नोकरीच्या आरक्षणामध्ये टक्केवारीची संख्या फारच कमी असल्यामुळे अंध, विधवा अपंग महिलांची हेळसांड होत असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) राज्यातील उक्त संदर्भात शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे असल्यास, अपंगाना नोकरीमध्ये जास्तीचे आरक्षण देण्यासंदर्भात शासन कोणता निर्णय घेणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२२-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही,
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी शहरात सयद शाह तुराबुल हक उरुसात यंदा वक्फ बोर्डाकडून उरुस परिसरात ४६५ दुकानांना परवानगी देण्यात आल्याबाबत**

**(२३) १३६५८ (०७-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरात सयद शाह तुराबुल हक उरुसात यंदा वक्फ बोर्डाकडून उरुस परिसरात ४६५ दुकानांना परवानगी देण्यात आली असून ३१ जानेवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, दिल्ली, हरियाणा, महाराष्ट्रातील नागपूर, वाशिम, जळगांव, धुळे, नाशिक, सांगली यासह मुंबई येथून व्यापारी व विक्रेते दुकान थाटतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुकानांना कोणत्याच प्रकारचे सोयी-सुविधा नसल्यामुळे त्यांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याठिकाणी मोठ्या प्रमाणात विविध ठिकाणाहून भाविक व व्यापारी येत असतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी /चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,
(५) तद्नुसार उपरोक्त परिसरात तात्काळ सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०७-२०१५) :** (१) होय.
(२) हे खरे नाही. उर्स परिसरात वक्फ मंडळाकडून सर्व दुकानदारांना दुकाने बांधून देण्यात येतात. दुकानात लाईट ची व्यवस्था केली जाते. तसेच अन्य सुविधा इतर विभागाकडून उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करण्यात येते.
(३) होय.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) पोलिस बंदोबस्त प्रशासकीय बंदोबस्त व पाणी पुरवठा या सेवा शासनामार्फत पुरविण्यात येतात.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जिंतुर (जि.परभणी) शहरातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील अनेक गैरसोयी दूर करण्याबाबत**

**(२४) १३६६२ (०८-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिंतुर (जि.परभणी) शहरातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय अनेक सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे तसेच सदरील महाविद्यालयाच्या परिसरात सर्वत्र घाणीचे वास्तव्य असल्यामुळे शिक्षण ग्रहण करणा-या विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदरील महाविद्यालयाला आवश्यक त्या सोईसुविधा देण्यासह महाविद्यालय परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर या संस्थेचा परिसर स्वच्छ आहे. संस्थेत कंत्राटी तत्वावर संस्थेच्या परिसराची स्वच्छता करण्यात येते व कोणाचेही आरोग्य धोक्यात नाही. संस्थेत

वेळोवेळी सोयीसुविधा पुरविण्यात येत आहेत. तसेच परिसर स्वच्छ असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यासंदर्भात संस्थेकडे कोणतीही तक्रार नसल्यामुळे सदर बाबत चौकशी करण्यात आली नसल्याचे प्र. प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, जिंतुर यांनी शासनास कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील विविध भागातून काम करण्यासाठी येणाऱ्या हजारो मजुरांना काम नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याबाबत**

**(२५) १३६६८ (०७-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील विविध भागातून काम करण्यासाठी येणाऱ्या हजारो मजुरांना काम नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यात दुष्काळाचे सावट असल्यामुळे मजूरांना काम मिळत नाही व मजूरीचे दरही निम्म्यावर येऊन ठेपले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मजूरांच्या हाताला काम उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
मजुरांच्या मागणीनुसार कामे उपलब्ध करुन दिली जातात. सद्य:स्थितीत मजूरीचा दर रु.१८१/- इतका आहे.
(३) परभणी जिल्ह्यात ग्रामपंचायतीची ३६९८ व यंत्रणेची १७८६ अशी एकूण ५४८४ कामे शेल्फवर आहेत. कामाची मागणी होताच कामे उपलब्ध करुन देण्याची तजविज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंधेरी (पूर्व) येथील मरोळ औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन औद्योगिक क्षेत्राच्या मध्यभागी येत असल्यामुळे निवासी इमारतींना असलेल्या धोक्याबाबत**

**(२६) १३६७० (१०-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भुखंडावर असलेल्या मरोळ औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्टयांचे पुनर्वसन करण्याचे कार्य एमआयडीसी विभाग क्र. १ ठाणे यांच्या निविदा क्र.TC/SLUM/MRL/४२५३/ of १९९३, dt.०८/१२/१९९४ अन्वये सुरु आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुनर्वसनाची निवासी योजना औद्योगिक क्षेत्राच्या मध्यभागी (औद्योगिक प्रकल्पांकरीता राखीव असलेल्या भूखंडावर) राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उद्योग प्रकल्पांपासून मध्यभागातील निवासी इमारतींना आपत्कालीन अपघात व तेथील रहिवाशांच्या जिवितास व आरोग्यास धोका निर्माण होऊ नये म्हणून विकास नियंत्रण नियमावलीनुसार बांधण्यात आलेल्या निवासी इमारतींनी सुरक्षात्मक व प्रतिबंधात्मक नियमांचे पालन केले आहे काय,
(४) नसल्यास, नियमांचे पालन न करता निवासी इमारती बांधण्यास परवानगी देणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच उपरोक्त निवासी इमारती व तेथील रहिवाशांचे जिवित व आरोग्य यांच्या सुरक्षेकरिता काय उपाययोजना करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (१५-०६-२०१५) :** (१) मरोळ औद्योगिक क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी जागतिक निविदा मागविण्यात आल्या होत्या. सर्वात जास्त बोलीचे मे.आकृती निर्माण प्रा.लि. यांची निविदा मंजूर करण्यात आली असून त्यांच्यासोबत करारनामा करुन दि.२६/१०/१९९५ रोजी काम सुरु करण्याचे त्यांना आदेश देण्यात आले.
(२) मरोळ औद्योगिक क्षेत्रातील (मोकळे भूखंड) औद्योगिक वापरासाठी असलेल्या भूखंडावर पॉकेट क्र. २, ३, ८ व ९ तसेच सुविधा भूखंडावर पॉकेट क्र. १ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविली जातात.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ३३ (१०) अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून निवासी इमारतीकरिता आपत्कालीन अपघात तसेच तेथील रहिवाश्यांच्या जिवीतास व आरोग्यास धोका निर्माण होवू नये म्हणून सुरक्षात्मक व प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एकूण ९६ हजार १७८ शाळांपैकी केवळ ३० हजार ४७१**
**शाळांनाच दहा पैकी दहा श्रेणी मिळाल्याबाबत**

**(२७) १३६८७ (०९-०४-२०१५). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीबाबत तयार केलेल्या अहवालातील आकडेवारीनुसार राज्यातील एकूण ९६ हजार १७८ शाळांपैकी केवळ ३० हजार ४७ शाळांनाच दहा पैकी दहा श्रेणी मिळाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता शासनाकडून कोणत्या उपायोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

U-DISE सन २०१४-१५ नुसार राज्यातील ९७०८४ शाळांपैकी २७०७३ इतक्या शाळा पूर्ण दहापैकी दहा श्रेणी/मानके पूर्ण केलेल्या आहेत.

(२) शिक्षण हक्क कायद्यातील तरतूदीनुसार आवश्यक भौतिक सुविधांबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना सर्व शिक्षा अभियान अंतर्गत U-DISE नुसार मुलभूत सुविधा उपलब्ध करण्यात येतात. या व्यतिरिक्त राज्य शासनाच्या योजनांमधूनही भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. अन्य शाळांच्या बाबतीत भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत संस्थांकडून कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्यातील**
**शेतक-यांच्या मुलांना नोकरी देण्याबाबत**

**(२८) १३६९० (१०-०४-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळ, नापिकी आणि त्यामुळे होणा-या शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्यात छोटे-छोटे उद्योग आणून त्यात शेतक-यांच्या मुलांना नोकरी देण्याबाबतचे धोरण शासन आखत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू धोरणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०६-२०१५) :** (१) (२) (३) व (४) कार्यरत उद्योग घटकांमध्ये स्थानिक युवक / युवतींना रोजगार संधी उपलब्ध होण्यासाठी शासन निर्णय क्र स्थालोरो /२००८/प्र.क्र.९३/उद्योग-६ दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ निर्गमित करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र औद्योगिक धोरण - २०१३ शासनाने जाहीर केले असून, सामूहिक प्रोत्साहन योजना २०१३ राबविण्यात येत आहे. सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत सूक्ष्म, लघू मध्यम व मोठया उद्योगांना विविध प्रकारची प्रोत्साहने देय करण्यात आली आहेत.

सदर योजनेस चांगला प्रतिसाद मिळाला असून, राज्यात विविध प्रकारचे उद्योग स्थापन झाले असून, त्यातून मोठया प्रमाणात गुंतवणूक व रोजगार निर्मिती झाली आहे.

---

**महाराष्ट्र सुरक्षा बलातील सर्व जवानांना गृह विभागांतर्गत कायमस्वरुपी नोकरी तसेच वेतन व सोयी सुविधा मिळण्याबाबत**

**(२९) १३६९१ (०७-०४-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुरक्षा बलातील सर्व जवानांना गृह विभागांतर्गत कायमस्वरुपी नोकरी मिळावी, सरकारी वेतन व सोयी सुविधा मिळाव्यात, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाच्या जवानांप्रमाणे सरकारी दर्जा मिळावा, बलाचे कामकाज गृह विभागाअंतर्गत चालावे इ.मागण्या गेली अनेक वर्षे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागण्यांची तातडीने पूर्तता करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

महामंडळातील नियुक्ती ही कंत्राटी स्वरुपाची असल्याचे सर्व उमेदवारांना त्यांच्या भरतीच्या वेळी किंबहुना भरतीसाठी देण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

या महामंडळावर शासकीय अनुदान अथवा अन्य आर्थिक स्त्रोत उपलब्ध नाही. महामंडळामार्फत शुल्क सुरक्षा रक्षकांच्या सेवा पुरविण्यात येतात. सुरक्षा रक्षकांचे वेतन व अन्य खर्च तसेच महामंडळाच्या कार्यालयीन खर्च, अधिकारी/कर्मचारी वर्गाचे वेतन इ. बाबी भागविल्या जात असल्याने महामंडळातील सुरक्षा रक्षकांना सद्यस्थितीत कायमस्वरुपी नोकरी, सरकारी वेतन व सोयी सुविधा, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाप्रमाणे सरकारी दर्जा देणे महामंडळास शक्य नाही.

---

**यवमाळ जिल्हा परिषदेच्या ग्राम पंचायतीकडे हातपंप दुरुस्तीचे पैसे थकीत असल्याबाबत**

**(३०) १३७१९ (०८-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवमाळ जिल्हा परिषदेच्या ग्राम पंचायतीकडे हातपंप दुरुस्तीचे लाखो रुपये थकीत असल्यामुळे हात पंप दुरुस्ती पथक संबंधीत गावाकडे फिरत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हातपंपाला वर्षाचे १ हजार रुपये मेंटेनन्स चार्ज म्हणून दुरुस्ती पथकाला ग्रामपंचायतीने देणे बंधनकारक असून ग्रामपंचायत त्याचा भरणा करीत नाही व नागरिकांकडून पाणीपट्टीची रक्कम वसूल केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेचे हातपंप दुरुस्ती पथक त्या गावात फिरकतच नाही मात्र उन्हाळा तोंडावर आला असता ग्रामपंचायतीचे याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) होय,

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत पिण्याचे पाणी ग्रामीण जनतेला उपलब्ध करुन देण्यासाठी विंधन विहीरी खोदण्यात येवून त्यावर हातपंप विद्यूतपंप बसविण्याचा कार्यक्रम शासनातर्फे राबविण्यात येतो. यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुक्यांमध्ये ८४०३ हातपंप असून सद्यस्थितीत ७८४० सुस्थितीतील हातपंप व २५८ विद्युतपंपाद्वारे प्रामुख्याने ग्रामीण भागातील जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यात येते.

सदर पंपाच्या दुरुस्तीकरिता प्रत्येक पंचायत समितीला एक या प्रमाणे एकूण १६ दुरुस्ती पथके कर्मचाऱ्यांसह उपलब्ध करुन देण्यात आलेली असून गट विकास अधिकारी यांचे आदेशानुसार पथकामार्फत हातपंप दुरुस्तीची कामे करण्यात येतात. तसेच त्यासाठी वाहने, कर्मचारी, हातपंपाचे सुटे भाग व अवजारे तसेच इंधन वंगण खरेदीसाठी योग्य तरतूद गट विकास अधिकारी यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

ग्रामपंचायतीकडून नियमानुसार वार्षिक वर्गणी वसूल करण्यात येते. जमा होणाऱ्या सदर वार्षिक वर्गणीच्या वसुलीचे रक्कमेतूनच हातपंप विद्युतपंप देखभाल दुरुस्ती योजनाही राबविण्यात येते. तथापि ग्रामपंचायतीकडे हातपंपाच्या दुरुस्तीसाठी वार्षिक रु.१५००/- प्रती हातपंप याप्रमाणे बरीच थकबाकी वसूल होणे बाकी आहे. ही वसूली ग्रामपंचायतींना देय असलेल्या इतर अनुदानातून वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

हातपंप दुरुस्तीची तक्रार पंचायत समिती स्तरावर प्राप्त झाल्यानंतर त्वरीत हातपंप दुरुस्तीची कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना गटविकास अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

पाणी टंचाईचे कालावधीत हातपंप दुरुस्तीची कामे प्राधान्याने पुर्ण करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंब तालुक्यातील (जि.यवतमाळ) मधील मेंढला येथील सिमेंट रस्त्याच्या कामात गैरप्रकार झाल्याबाबत**

**(३१) १३७२४ (०९-०७-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब तालुक्यातील (जि.यवतमाळ) येथे १३ व्या वित्त आयोगामध्ये मेंढला येथील शंकरपूर रोड ते ग्रामपंचायतीकडे जाणा-या मार्गावर सिमेंट रस्त्याचे काम सुरु असून सदर काम हे निकृष्ट दर्जाचे होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिमेंट रस्त्याचे कामात जाडी ९ इंचापेक्षा जास्त असणे गरजेचे असताना केवळ अडीच ते ३ इंच व गजांचा वापरही अतिशय अल्प प्रमाणात असून त्यामध्ये ६ एमएम चे उभे ३ गज व आडवे गज टाकण्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असून तसेच कामाकरीता रेती नसल्याची व सिमेंट अल्प प्रमाणात असून सदर कामात पारदर्शता नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर कामाची तातडीने चौकशी करावी अशी मागणी उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, यांनी केली आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील ४५ वनमजुरांच्या वार्षिक वेतनाचे**
**अडीच कोटी पाण्यात जात असल्याबाबत**

**(३२) १३७३७ (०८-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वनवृत्तातील जंगलामध्ये मौल्यवान सागवान वृक्षाबरोबर इतरही वनसंपदा विपुल प्रमाणात असून या संपुर्ण जंगलाचे संरक्षण आणि तेथील कामांची जबाबदारी वनमजुरांनी सांभाळण्याचे निर्देश असताना यवतमाळ वनवृत्ताच्या प्रमुख आणि वरिष्ठ वनधिका-यांच्या कार्यालयातच नव्हे तर निवासस्थानीही वनमजूर कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) यवतमाळ वनवृत्ताचे मुख्यालय असलेल्या सीसीएफ कार्यालयात ७ वनमजुर, यवतमाळ उपवनसरंक्षक कार्यालयात १०, यवतमाळ वनपरिक्षेत्र कार्यालयात १०, कार्य आयोजन कार्यालयात ४, दक्षता पथक कार्यालयात २ आणि इतर सर्वच वनाधिका-यांच्या निवासस्थानी १९ असे एकूण ४५ वनमजूर पडेल ती कामे व वरिष्ठांच्या सरबराईत व्यस्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ४५ वनमजुरांच्या वेतनावर वर्षासाठी सुमारे अडीच कोटी रुपयांच्या खर्चाचा शासनाच्या तिजोरीवरील भुर्दंड असून याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली व येत आहे व कसे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०६-२०१५) :** (१) वनसंरक्षण व वनसंवर्धन या कामास प्रथम प्राधान्य देताना, त्या कामाच्या अनुषंगिक असलेली कामे, जसे क्षेत्रिय कर्मचाऱ्यांकडून वनसंरक्षण संबंधातील संदेश प्राप्त करुन घेवून सदर संदेश संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना पोहचविणे, शासकीय कार्यालय व शासकीय निवासस्थाने येथील परिसर देखभाल (वसाहत) व शासनाच्या मालमत्तेचे संरक्षण करणे इत्यादी कामे करुन घेण्यात येतात.
(२) मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यवतमाळ यांचे कार्यालयात ४, उपवनसंरक्षक, यवतमाळ यांच्या कार्यालयात ४, यवतमाळ वनपरिक्षेत्र कार्यालयात २, वनसंरक्षक कार्याआयोजना यांच्या कार्यालयात १, सहाय्यक वनसंरक्षक (संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन) यांच्या कार्यालयात २

व वन अधिकाऱ्यांच्या निवासस्थान परिसरात (वसाहतीमध्ये) ८ असे एकूण २१ वनमजूर कार्यरत आहेत. या वनमजूरांकडून कार्यालयाच्या परिसराची स्वच्छता करणे, कार्यालयाच्या/निवास्थानाच्या परिसरातील शासकीय वाहने व वनगुन्हा प्रकरणातील जप्त वाहने/मौलवान इमारती मालाचे संरक्षण करणे, निवासस्थान परिसरातील रोपवाटीकांचे संरक्षण करणे ही कामे केली जातात. सदर कामे ही शासन निर्णयानुसार वनमजूरांकडून करणे अपेक्षित असल्याने व तो शासकीय कामाचा भाग असल्याने, वरिष्ठांच्या सरबराईत वनमजूर व्यस्त असतात, असे म्हणने वस्तुस्थितीवर आधारीत नसून, ते खरे नाही.
(३) विहीत कामे करुन घेण्यात येत असल्याने जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील अनेक रस्त्यांची झालेली दुरावस्था

**(३३) १३७६४ (१०-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील अनेक रस्त्यांची दुरावस्था झाली असून वाहतुकीची मोठ्या प्रमाणात ये-जा होत असल्यामुळे प्रवाशांना व शाळेत जाणा-या विद्यार्थ्यांना प्रवास करताना खूपच त्रास सहन करावा लागत असल्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष व संतापाची भावना पसरली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रस्त्यांची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत तसेच रस्त्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणा-या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०७-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
मंगळवेढा तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाकडील २३ रस्त्यांपैकी ४ रस्ते वाळूच्या अवजड वाहतूकीमुळे खराब झालेले असून उर्वरीत रस्ते सुस्थितीत आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.
खराब झालेल्या ४ रस्त्यांची तात्पुरती दुरुस्ती खडी व मुरमाने करुन वाहतूकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेले आहेत. कायमस्वरुपी दुरुस्तीकरीता मंजुरीची कार्यवाही करण्यात येत असून निधी, निकष व प्राथम्यक्रमाने ही कामे हाती घ्यावयाचे नियोजन आहे.

---

**सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या सातबारा उतारा नोंदणी व फेरफार करणे यासाठी तलाठी व मंडळ अधिकारी टाळाटाळ करीत असल्याबाबत**

**(३४) १३७६८ (०४-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील सुमारे ९० टक्के गावातील ग्रामस्थ व शेतकरी यांना सातबारा उतारा नोंदणी व फेरफार करणे यासाठी तलाठी व मंडळ अधिकारी टाळाटाळ व दिरंगाई करीत असल्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष पसरला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी व ग्रामस्थ यांची सातबारा उतारा नोंदणी करणे व फेरफार करणे इत्यादी काम त्वरीत करुन मिळण्याबाबत टाळाटाळ व दिरंगाई करणा-या तलाठी व मंडळ अधिकारी यांचेवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०७-२०१५) :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा तालुकयातील भटक्या विमुक्त जातीतील लोकांची घरे अतिक्रमण मोहिम राबविताना जमीनदोस्त करण्यात आल्याबाबत**

**(३५) १३७६९ (१०-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा तालुकयातील गेली १५ ते २० वर्षापासून वास्तव्यास असलेल्या भटक्या विमुक्त जातीतील लोकांची सुमारे ५० झोपड्या असून ५०० लोक या ठिकाणी वास्तव्यास होते. अतिक्रमण मोहिम राबविताना या गरीब नागरिकांची घरे जमीनदोस्त करण्यात आल्यामुळे या लोकांवर बेघर होण्याची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे या बेघर गरीब जनतेला अद्यापही पर्यायी जागा उपलब्ध झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१७-०७-२०१५) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

मंगळवेढा नगरपरिषदेने नगरपरिषदेच्या मालकीच्या कोणत्याही जागेवरील भटक्या विमुक्त जातीतील लोकांच्या झोपड्या काढलेल्या नाहीत. मात्र अतिक्रमण मोहीम राबवित असताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या जागेवर असलेले अतिक्रमण सार्वजनिक

बांधकाम विभागाने काढलेले आहे. सदर झोपडीधारकांना सूचना देऊन झोपड्या काढून घेण्याबाबत मुदत दिली होती. त्यानुसार संबंधित अनधिकृत झोपडीधारकांनी स्वतःहून झोपड्या काढून घेतल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

सदर बेघर गरीब जनतेचा जागा मागणीबाबतचा कोणताही प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर यांचेकडे किंवा शासनाकडे प्राप्त नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात करार पध्दतीवर काम करणा-या २८ कर्मचा-यांना कायमस्वरुपी नियमित सेवेवर सामावून घेण्याबाबत**

**(३६) १३७८९ (०९-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या स्थापनेपासून करार पध्दतीवर तुटपुंज्या पगारावर काम करणा-या २८ कर्मचा-यांना कायमस्वरुपी नियमित सेवेवर सामावून घेण्याकरिता दिनांक १७ डिसेंबर, २०१४ व दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचा-यांना आरोग्य सेवेत अत्यावश्यक सेवा म्हणून नियमित सेवेत सामावून घेण्याची शिफारस व प्रस्ताव महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांनी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय मुंबई यांच्याकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कर्मचा-यास नियमित सेवेत सामावून घेण्याकरिता शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०७-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) शासनस्तरावर विचारधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयात नवीन पोलीस ठाणे व पदे निर्माण करण्याबाबत**

**(३७) १३८०७ (०७-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील लोकसंख्येचा विचार करता पोलिस ठाणे कमी आहेत तसेच पोलिस यंत्रणा कमी पडत असल्याने पोलिसांवर अतिरिक्त ताण पडत आहे असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन पोलीस ठाणे व पदे निर्मितीसंबंधी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) महाराष्ट्र राज्य पोलीस दलात निर्माण करावयाच्या ६१४९४ पद निर्मितीच्या प्रस्तावातील पहिल्या टप्प्यात दोन नवीन पोलीस ठाण्यांसह विविध संवर्गातील एकूण १८४ पदे पोलीस अधिक्षक, सोलापूर (ग्रा.) यांच्या अधिनस्त निर्माण करण्यात आली आहे.

---

**सोलापूर जिल्हयातील बचत गटांना हक्काची बाजारपेठेसाठी जागा उपलब्ध नसल्याबाबत**

**(३८) १३८१६ (०८-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील बचत गटांना हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून जिल्हास्तरीय विक्री केंद्र बांधण्यासाठी निधिची तरतूद केली होती. परंतु जागा उपलब्ध नसल्याने इमारतीचे काम मागील सहा वर्षापासून रखडले आहे असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जागा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) होय.
(२) (३) व (४) स्वर्ण जयंती ग्रामस्वरोजगार योजनेअंतर्गत जिल्हास्तरावर कायमस्वरुपी विक्री केंद्र बांधकामासाठी जिल्हा परिषद मालकीची पंचायत समिती दक्षिण सोलापूर समोरील जागा नगर भूमापन क्रमांक ८४१३/१ मधील १००० चौरस मीटर जागा जिल्हा परिषदेने विनामूल्य हस्तांतरण करुन घेणेस मंजूरी दिली आहे. सदर जागा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या नावे करणेसाठीची कार्यवाही चालू आहे. जिल्हास्तरावर कायमस्वरुपी विक्री केंद्र बांधणेची योजना राज्य शासनाची होती. तथापि केंद्र शासनाची योजना ७५% केंद्र हिस्सा व २५% राज्य हिस्सा याप्रमाणे स्विकारल्याने यापूर्वीचा राज्य शासनाचा प्राप्त निधी राज्य शासनास परत करणेत आला आहे. तसेच जागा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या नावे झालेनंतर राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे नव्याने प्रस्ताव सादर करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

---

**हातकणंगले ( जि.कोल्हापूर) ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला अनुपस्थित राहून नंतर खोट्या सहया करणा-या १३ ग्रामपंचायत सदस्यांचे सदस्य पद रद्द करण्याबाबत**

**(३९) १३८१७ (०८-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातकणंगले जि.कोल्हापूर ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला अनुपस्थित राहून नंतर खोट्या सहया करणा-या १३ ग्रामपंचायत सदस्यांचे सदस्य पद रद्द करण्याचा ठराव माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास केला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सदस्यांचे सदस्य पद रद्द करण्यात आले आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

ग्रामपंचायत हातकणंगले, ता.हातकणंगले या ग्रामपंचायतीची माहे नोव्हेंबर, २०१४ ची मासिक सभा दिनांक २८/११/२०१४ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर ग्रामपंचायतीची सदस्य संख्या १७ असून सरपंच व उपसरपंचासहीत एकूण १५ सदस्य उपस्थित होते व २ सदस्य अनुपस्थित होते. त्याच दिवशी दुपारी २.०० वाजता ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. मासिक सभा संपल्यानंतर ग्रामपंचायत सदस्यांनी ग्रामसभेच्या हजेरी पुस्तकावर सहया केल्या व ते निघून गेले. सदर ग्रामपंचायत सदस्य निघून गेल्यावर ग्रामसभा घेण्यात आली होती.

ग्रामपंचायत हातकणंगले मध्ये एकूण १७ सदस्य असून त्यापैकी ग्रामसभेच्या हजेरी पुस्तकावर सहया केलेले एकूण १५ सदस्यांपैकी ११ सदस्य निघून गेले. उर्वरित ४ सदस्य ग्रामसभा संपेपर्यंत उपस्थित होते.

दिनांक २६/०१/२०१५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या ग्रामसभेत मागील दिनांक २८/११/२०१४ च्या ग्रामसभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे या विषयात ग्रामपंचायत सदस्य यांनी मागील सभेला उपस्थित नसताना सहया केल्या आहेत त्यामुळे त्यांनी जनतेची फसवणूक केली आहे. तरी, त्यांचे सदस्य पद रद्द करावे असे ग्रामसभा ठराव क्र. ३६, दिनांक २६/०१/२०१५ मध्ये नमूद केले आहे.
(२) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम मध्ये ग्रामसभेने केलेल्या ठरावानुसार ग्रामपंचायत सदस्य पद रद्द करण्याबाबत तरतूद नसल्याने सदस्यांचे सदस्य पद रद्द करण्यात आलेले नाही. परंतु, ग्रामसभा सुरु होण्यापुर्वीच उपस्थिती पत्रकावर सहया करुन प्रत्यक्ष ग्रामसभेस गैरहजर राहिल्याबद्दल संबंधित ११ सदस्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन समज देण्यात आलेली आहे.

---

**जमाबंदी आयुक्तांनी कामचुकार कर्मचा-यांवर केलेल्या कारवाईबाबत**

**(४०) १३८३५ (०४-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जमाबंदी आयुक्तांनी कामचुकार कर्मचा-यांवर केलेल्या कारवाईच्या निषेधार्थ पुणे विभागातील कर्मचा-यांनी माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास बंद आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे भूमि अभिलेख कार्यालयातील अनेकांची कर्जप्रकरणे वा अन्य कामे प्रलंबित असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे मार्गी लावण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, या संपकारी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख कर्मचारी संघटना पुणे विभाग यानी विविध मागण्यांच्या अनुषंगाने दि. १६/१/२०१५ ते ९/२/२०१५ कालावधीत कामबंद आंदोलन केले होते. कामबंद काळातील प्रलंबित मोजणी प्रकरणे नव्याने तारखा देवून निकाली करणेची काग्रवाही करणेत येत आहे. गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ कामावर हजर होवून नियमानुसार कामकाज करण्याबाबत दिनांक ०३/२/२०१५ रोजी कारणे दाखवा नोटीसा देण्यात आल्या असता संघटनेने दिनांक ९/२/२०१५ पासून कामबंद आंदोलन मागे घेतलेले आहे.

---

### कोल्हापूर जिल्हयात मनरेगामधील विविध कामांमध्ये गेल्या तीन वर्षात कोटयवधी रूपयांचा अपहार झाल्याबाबत

**(४१) १३८३६ (०८-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात मनरेगामधील विविध कामांमध्ये गेल्या तीन वर्षात कोटयवधी रूपयांचा अपहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) चौकशीनुसार पुढे संबंधितांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### इचलकरंजी शहरातील (जि.कोल्हापूर) अडत पेठ येथे बेकायदा आंतरराष्ट्रीय कॉल सेंटर सुरु असल्याबाबत

**(४२) १३८५१ (०७-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरातील अडत पेठ येथे एका इमारतीत बेकायदा आंतरराष्ट्रीय कॉल सेंटर सुरु असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कॉल सेंटरवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :**(१) प्रश्नात नमूद ठिकाणी आरोपीने त्याचे घर/ऑफीस मध्ये दि. ३०/१२/१४ ते २३/०१/१५ या कालावधीत विविध मोबाईल कंपन्यांचे सीम कार्ड वापरुन सीमबॉक्सद्वारे आंतरराष्ट्रीय कॉल्सचे स्थानिक कॉल्सचे दरात रुपांतर करुन ग्राहकांना अनाधिकृत सेवा उपलब्ध करुन देवून मोबाईल कंपन्यांची व भारत सरकारची सुमारे २ कोटी रुपयाची फसवणूक केल्याबाबत गुन्हा दाखल आहे.
(२) प्रकरणी इचलकरंजी पोलीस स्टेशन येथे गु.र.न. ११/२०१५ भा.द.वि.स. कलम ४२०, १२० (ब) सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (ड) सह भारतीय दुरसंचार अधिनियम कलम ४, २० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्यातील ७ पैकी ६ आरोपींना अटक करण्यात आली असून रु. ३६.२० लक्ष किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील वडगांव या परिसरात पालिका व पोलिस प्रशासनाने वाहनांच्या पार्किंगचे नियोजन केलेले नसल्याबाबत

**(४३) १३८५४ (०७-०४-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील वडगांव या परिसरात ३२ गावांची बाजारपेठ, पालिका, बाजार समिती मंडळ, भूमापन, न्यायालय आदि कार्यालये तसेच वैद्यकीय व शैक्षणिक सुविधा असल्याने या शहरात स्थायिक व कामानिमित्त येणा-यांची संख्या जास्त असून पालिका व पोलिस प्रशासनाने येथे वाहनांच्या पार्किंगचे नियोजन केलेले नसल्याने वारंवार वाहतूक कोंडी होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शहरात वाहतूक नियोजन करण्याकरिता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, कशा प्रकारे वाहतूकीचे नियोजन करण्यात आले आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

वडगाव शहरामधून सांगली जिल्ह्याकडे, इचलकरंजीकडे जाण्यासाठी जवळचा मार्ग आहे. तसेच, वाठार-सावडे आणि टोप भादोले तासगाव हा राज्यमार्ग वडगाव शहरातून जातो. वडगाव हे व्यापारी पेठ असल्याने आजूबाजूच्या ग्रामीण भागातील बहुसंख्य लोक व्यापार/बाजार

करण्याकरीता वडगाव शहरात येतात. त्यामुळे काही वेळा विशेषत: सोमवारी आठवडा बाजराच्या दिवशी वाहतूकीची कोंडी होते.
(२) व (३) वडगाव नगरपालिका हद्दीतील एस.टी.स्टँड ते आंबेडकर चौक-वाठार नाका हा रस्ता तसेच एस.टी.स्टँड ते ठाणेकर चौक-हजारे कोपरा वाठार नाका हे रस्ते एक दिशा मार्ग करण्यात आले आहेत. शहरात वाहतूक मार्गदर्शक फलक लावण्यात आले आहेत. या परिसरात दुचाकी पार्किंगची समस्या सोडविण्याकरीता बी.वाय. हॉस्पीटल येथे दुचाकी वाहनांकरीता स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते बिरदेव चौक तसेच नगरपालिका चौकात वाहने पार्किंगकरीता पांढरे पट्टे मारण्यात आले आहेत. एस.टी. स्टँडच्या मागील बाजूस असणाऱ्या के.एम. बस थांब्यामुळे वाहतूक कोंडी होत असल्यामुळे हा बस थांबा हातकणंगले रोडवरील सालपे कॉम्प्लेक्स येथे स्थलांतरीत करण्यात आला आहे. तसेच, वाहतूक कोंडी सोडविण्याकरीता महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या ताब्यातील ८० चौ.मी. जागा नगरपरिषदेने ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

शहरामध्ये वाहतूक कोंडी होऊ नये याकरीता वाहतूक नियंत्रण/सुरळीत ठेवण्याकरीता पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची गस्त तसेच फिक्स पॉईंट नेमण्यात आले आहेत.

---

**शाळा दर्पण या योजनेद्वारे विद्यार्थ्यांची सर्व माहिती पालकांना एसएमएसद्वारे देण्याबाबतची योजना**

**(४४) १३८६४ (०९-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आपल्या पाल्याची अभ्यासातील प्रगती, त्याची उपस्थिती, त्याची गुणपत्रिका, आरोग्य विषयक माहिती, शाळेचे उपक्रम इ. माहिती पालकांना मोबाईलवरच उपलब्ध होणार असल्याने शाळा दर्पण या योजनेद्वारे विद्यार्थ्यांची सर्व माहिती एसएमएसद्वारे देण्याची योजना महाराष्ट्रालाही लागू करण्याची राज्याची सूचना केंद्र शासनाने मान्य केली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, सदर योजना कोणत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यात लागू होणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) सदरची योजना महाराष्ट्र राज्यात कार्यान्वित करण्याची विनंती केंद्र शासनास करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अपंग तसेच निराधारांना देण्यात येणाऱ्या निवृत्ती वेतनात वाढ करण्याबाबत**

**(४५) १३८८१ (०९-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंग, निराधारांना शासनाच्यावतीने सध्या दरमहा ६०० रुपयांचे निवृत्ती वेतन दिले जाते. सध्याच्या काळात हे निवृत्ती वेतन तुटपुंजे असून यामध्ये वाढ करुन किमान १ हजार ५०० रुपये निवृत्ती वेतन घ्यावे, तसेच इतर मागण्या विशाखा महिला लोक संचलित साधन केंद्राच्या वतीने मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांना निवेदन देऊन करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त संस्थेच्या वतीने सादर केलेल्या निवेदनावर निर्णय घेऊन शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर निवेदनातील इतर मागण्यांसंदर्भात पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी प्रस्तुत निवेदनाच्या प्रती सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना या विभागाच्या दि.२२.४.२०१५ च्या पत्रान्वये पाठविण्यात आलेल्या आहेत. तसेच संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना रुपये १०००/- मासिक निवृत्ती वेतन देण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली दि.२.३.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार नविन योजनेबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंसाठी जिल्हास्तरीय विक्री केंद्र उभारण्याचा प्रस्ताव रखडला असल्याबाबत**

**(४६) १३८८३ (०८-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंसाठी जिल्हास्तरीय विक्री केंद्र उभारण्यास सन २००९-१० मध्ये दीड कोटी रुपयांच्या निधीसह मंजूरी मिळाली परंतु तांत्रिक त्रुटीच्या पुर्ततेअभावी तो प्रस्ताव रखडला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रस्तावावर शासनाने निर्णय घेवून काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) नाही.

बचत गटांची उत्पदित केलेल्या मालाच्या विक्री करीता तालुका व जिल्हास्तरीय कायमस्वरुपी

विक्री केंद्र बांधण्याचा निर्णय दिनांक २७.०२.२००९ अन्वये शासनाने घेतला आहे. त्यानुसार शासन निर्णय दिनांक ११.०८.२००९ अन्वये ८ जिल्हास्तरीय विक्री केंद्राना मंजूरी दिली असून त्यासाठी प्रत्येकी रु.५०.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

दरम्यान केंद्र शासनाने त्याच उद्देशाने गाव, जिल्हा व राज्यस्तरावर कायमस्वरुपी विक्री केंद्र बांधण्याचा निर्णय घेतला असून या दोन्ही निर्णयामध्ये जिल्हास्तरावर कायमस्वरुपी विक्री केंद्र बांधण्याची बाब समान असल्याने एकाच उद्देशाकरीता राज्य व केंद्र योजना अंमलात आणणे आवश्यक नाहीत. त्याअनुषंगाने शासन निर्णय दिनांक ०९.१२.२०११ अन्वये स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत केंद्र शासनाची गाव हाट, जिल्हा व राज्यस्तर कायमस्वरुपी विक्री केंद्र बांधण्याची ७५ % केंद्र २५% राज्य आर्थिक सहभाग योजना स्विकारली आहे. सदर योजनेनुसार जिल्हा स्तरीय विक्री केंद्र बांधकामाकरीता रु.१५०.०० लक्ष इतका निधी निश्चित करण्यात आलेला आहे.

त्यास अनुसरुन राज्यात जिल्हास्तरीय विक्री केंद्र बांधण्याकरीता प्रस्ताव सादर करण्याबाबत सर्व जिल्ह्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातल्या वाढत्या वेश्या व्यवसायाला पायबंद घालण्याबाबत**

**(४७) १३८८६ (०८-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात अनधिकृत वेश्या व्यवसायात गुंतलेल्या महिलांची केंद्र सरकारने अधिकृत नोंदणी केली आहे, त्यात महाराष्ट्र सर्वात पुढे आहे राज्यात ४ लाख १ हजार ३०० वेश्यांची नोंद करण्यात आली आहे, त्यात सव्वा लाख मुली या अल्पवयीन असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातल्या वाढत्या वेश्या व्यवसायाला पायबंद घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०१५) :**(१) व (२) राज्यातील वाढत्या वेश्या व्यवसायाला आळा घालण्यासाठी दिनांक ३१.०३.२००८ रोजी राज्य गुन्हे अन्वेषण विभागात “अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध” या समन्वय कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. अपर पोलीस महासंचालक, महिला अत्याचार प्रतिबंधक कक्ष, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राज्याचे समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

राज्यात मुंबई शहर, नागपूर शहर, पुणे शहर, ठाणे शहर, नवी मुंबई, सोलापूर शहर, यवतमाळ, बीड, अहमदनगर, कोल्हापूर, ठाणे ग्रामीण, व सांगली या १२ ठिकाणी केंद्र व राज्य शासनाच्या अधिपत्याखाली स्वतंत्र “अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष” स्थापन करण्यात आले आहे. सदर १२ कक्षांना पूरेसे मनुष्यबळ व साधनसामग्री देवून सक्षम करण्यात आले

आहे. सदर कक्षांनी स्थापनेपासून फेब्रुवारी २०१५ अखेर पीडितांच्या सुटकेसाठी ११६८ धाडी (Rescue Operation) घालून ५८७१ पीडित महिला व मुलींची सुटका करण्यात आली आहे. तसेच सदर धाडीत ३४७७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

हरवलेल्या बालक/बालीकाबाबत संबंधित पालकांकडून पोलीस ठाण्यात तक्रारी प्राप्त झाल्यास याबाबत थेट गुन्हा दाखल करण्यात येतो. पोलीस ठाणेस्तरावर शोध घेण्यास चार महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाल्यास असे गुन्हे त्या-त्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक घटकाकडे पाठविण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. हरविलेल्या बालकांचा तपास करण्याकरीता सुधारित कार्यप्रणाली तयार करण्यात आली आहे. हरविलेल्या तसेच सापडलेल्या बालक/बालिकांची नोंद ठेवण्याकरीता तसेच त्यांची माहिती भरुन शोध घेणे सोपे जावे व शोध लागलेल्या बालकांना त्यांचे पालकांच्या ताब्यात देण्याचे प्रमाण जास्तीत जास्त व्हावे याकरीता केंद्र सरकारच्या गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांचेतर्फे www.trackcmissingechild.gov.in या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालयातील पोलीस आयुक्त यांना अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा १९५६ अंतर्गत कुंटणखाने बंद करण्याकरीता अधिकार प्रदान करण्यात आले आहे. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध या संदर्भात नोडल सेलमार्फत प्रशिक्षण केंद्रामध्ये विधी अधिकारी, अशासकीय संस्थांचे सदस्य, पोलीस अधिकारी तसेच पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक यांच्या कार्यशाळा आयोजित करुन त्यांना आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आवळी पठार (गारवडी) (ता.खटाव,जि.सातारा) गावात निर्माण झालेली पाणीटंचाई**

**(४८) १३९२९ (०७-०४-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आवळी पठार (गारवडी) (ता.खटाव, जि.सातारा) गावात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून तेथील ग्रामस्थांनी विशेषतः महिलांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाला टँकरने पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत मा. स्थानिक लोकप्रतिनिधींनी व तेथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, सातारा व संबंधित तहसिलदारांकडे वेळोवेळी मागणी करुन सुध्दा अद्यापही टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत, सदर गावाला टँकरद्वारे त्वरित पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०७-२०१५) :** (१) मौजे आवळे पठार (गारवडी), ता.खटाव या गावात पाणी टंचाई निर्माण झाली होती, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

मौजे आवळे पठार (गारवडी) येथे एका शासकीय टँकरद्वारे एक दिवसाआड १ खेप याप्रमाणे दिनांक १४.०२.२०१५ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तसेच, मौजे गारवडी या गावी १ टँकरद्वारे प्रतिदिन १ खेपाद्वारे दिनांक २४.०३.२०१५ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मनमाड, जि.नाशिक या शहरातील विविध भागात चांगले रस्ते तयार करण्यासाठी शासनाकडून मनमाड नगर परिषदेला मिळालेल्या निधीचा गैरवापर झाल्याबाबत**

**(४९) १३९३१ (०७-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड, जि.नाशिक या शहरातील विविध भागात चांगले रस्ते तयार करण्यासाठी शासनाकडून मनमाड नगर परिषदेला मिळालेल्या निधीचा गैरवापर करण्यात आल्याचा गंभीर प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गैरव्यवहारातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथे सुरु होणाऱ्या सिंहस्थानासाठी महापालिकेने रस्त्यांच्या कामासाठी तब्बल २४०० वृक्षांची तोड केल्याबाबत**

**(५०) १३९३८ (०७-०४-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे सुरु होणाऱ्या सिंहस्थानासाठी महापालिकेने रस्त्यांच्या कामासाठी तब्बल २४०० वृक्षांची तोड करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्षतोडीपासून वृक्ष वाचविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :** (१) व (२) नाशिक येथे सुरु हेणा-या सन २०१५-१६ च्या सिंहस्थ कुंभमेळ्यांसाठी महानगरपालिकेने रस्त्याच्या तथा पुलांच्या कामात अडथळा ठरणा-या २४०० झाडांना तोडणे/पुर्णरोप करण्यासाठी परवानगी देण्याची विनंती वृक्ष प्राधिकरणाकडे केली होती.

या संदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक ४१/२००६ मध्ये नाशिक नागरी कृती समितीने सिव्हील ॲप्लीकेशन क्र.९६/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ८.५.२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार ८२६ वृक्ष तोडण्याबाबत व ६०५ वृक्षांचे पुर्णरोपन करण्याबात कार्यवाही करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.